# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Illegal Property**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **04/02/2022**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मानोरा येथील ठाणेदार श्री सुनील जाधव व त्यांचे पथकाने जनावराची निर्दयतेने कत्तल करून त्याची बेकायदेशीररित्या मांस वाहतूक करणारा बुलेरो पिकअप या वाहनासह एक आरोपी ताब्यात घेऊन मुद्देमाल जप्त केला आहे.



**मानोरा : जनावराचे मास घेऊन जाणारे बोलेरो पीकअप वाहन व आरोपीसह पोलिस.**

## जनावरांचे मास घेऊन जाणारे वाहन पकडले

**मानोरा :** जनावरांच्या मासाची बेकायदेशीरपणे वाहतूक करणारे बोलेरो पिकअप वाहन मानोरा पोलिसांनी पकडले. जमादार जगनाथ घाटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी मोहमद रईस अब्दुल सईस यांचे विरुद्ध प्राणी अधिनियम कलम ७, ८ भादवीनुसार गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करण्यात आली. मंगरुळपीर येथून बोलेरो पिकअप एम एच टी.११९८ या वाहनातून जनावरांचे मास आदीलाबाद बाजारात विक्री करिता नेत असल्याची माहिती मिळाल्याने जमादार जगन्नाथ घाटे व पोलिस शिपाई महादेव पायघन यांनी एम आय डी सी जवळ वाहन अडवून विचारपूस केली असता वाहकाने उडवाउडवीची उत्तरे दिली. वाहनात जनावरांचे मास असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर वाहन पोलिस स्टेशनला लावण्यात आले. जमादार जगन्नाथ घाटे यांनी पोलिस स्टेशनला फिर्याद दाखल केल्याने आरोपी मोहमद रईस अब्दुल सईस यांचे विरुद्ध प्राणी अधिनियम कलम ७ , ८ भादवीनुसार गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करण्यात आली. पोलिस निरीक्षक सुनील जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार जगन्नाथ घाटे पोलिस शिपाई महादेव पायघन अधिक तपास करीत करीत आहे.